IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वराचे समतावादी आणि मानवतावादी विचार

**[1] सोनाली रामचंद्र सावंत, [2] प्रा. डॉ. संजय तुकाराम वाघमारे**

[1]संशोधक विद्यार्थी
[2] सहायक प्राध्यापक, इतिहास संशोधन केंद्र
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलुज

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*महात्मा बसवेश्वर*

**ABSTRACT**

कोणत्याही समाजात जेव्हा समस्या निर्माण होतात, तेव्हाच समाज सुधारकांची गरज भासते. महाराष्ट्राच्या आणि भारताच्या जडणघडणीत समाज सुधारकांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. समाजात जर समस्याच नसतील तर समाजसेवक निर्माण होणार नाहीत. जे समाजाच्या बाबतीत आहे तेच धर्माच्या बाबतीत आहे. नव्या धर्माची आवश्यकता किंवा धर्म सुधारण्याची गरजच एखाद्या धर्म सुधारकाला जन्मास घालते. समाजातील अन्यायकारक प्रथा, जातीभेद आणि अंधश्रद्धा विरुद्ध लढा देऊन समतेची भावना रुढ करणे हा समाजसुधारकांचा मूळ उद्देश असतो. महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला तेव्हाही समाज अशाच प्रकारच्या परिस्थितीचा सामना करत होता. स्त्री-पुरुषांमध्ये भेद मानला जात होता, समाजात जातीभेद होता, उच्चनीचता होती, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना समाजात निम्न स्थान होते. समाजात त्यांचा दर्जा कमी लेखला जात होता.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Sawant, Sonali Ramchandra, & Waghmare, Sanjay Tukaram. (2025). महात्मा बसवेश्वराचे समतावादी आणि मानवतावादी विचार. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 2(I), 442–446.

- **स्त्री-पुरुष समानता :-**

बसवेश्वरांचा काळात म्हणजेच बाराव्या शतकात स्त्रियांना पुरुषासारखे हक्क आणि अधिकार नव्हते. सामाजिक दृष्ट्या त्यांचा दर्जा कनिष्ठ होता. समाजात स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय होते. देवाला मुली व मुले वाहण्याची प्रथा या काळात होती. देवाला वाहिलेल्या या मुलींना देवदासी असे म्हणतात. त्यांना स्वतः चा संसार थाटता येत नसे. त्यांना सर्व आयुष्य देवाची सेवा करण्यात घालवावी लागत असे. देवदासी देवाच्या सेवेसाठीच अर्पण केलेल्या असत. देवदासी, मुरळी, जोगतीन त्यांचे मंदिरातील बडवे व पुजारी याच्याकडून शारीरिक शोषण केले जात तसेच समाजात वेश्या व्यवसाय मोठ्या प्रमाणात होता. राजे लोक युद्धात हाती आलेले स्त्रियांना जनानखाण्यात ठेवत असत. समाजात बहुपत्नीत्वाची प्रथा प्रचलित होती. बालविवाह होत होते, परंतु विधवा स्त्रियांची स्थिती दयनीय होती. समाजात सतीची चाल ही प्रचलित होते. समाजाने स्त्रियांवर विविध बंधने लादली होती. स्त्रियांना गावातून जाताना अनवाणी पायाने जावे लागत. एकूण स्त्रियांची स्थिती चांगली नव्हती.

बसवेश्वरांच्या काळात कर्नाटकात शैव, वैष्णव, जैन, बौद्ध धर्म प्रचलित होते, त्यामुळे आपल्या समजुती आणि अनावश्यक कर्मकांडात अडकून आपली कल्पकता पूर्णपणे समाजाने गमावली होती. बसवेश्वरांचा ज्या काळात जन्म झाला त्या काळात समाजात जाती-जातीत व स्त्री-पुरुषा विषमता निर्माण झाली होती. बसवेश्वरांनी मात्र सुरुवातीपासूनच या व्यवस्थेचा सखोल दृष्टिकोनातून अभ्यास करून या व्यवस्थेला विरोध करून जातीविषयक आणि स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. बसवेश्वरांचा उपनयनाचा प्रसंग आला तेव्हा, बसवेश्वरांनी आपली मोठी बहीण हिचा उपनयन संस्कार अधी झाला पाहिजे असा हट्ट केला. वैदिक काळात स्त्रियांना उपनयनाचा अधिकार नव्हता विवाह हाच स्त्रियांचा उपनयसंस्कार समजला गेला होता त्यामुळे त्यांना वेगळया उपनय संस्कार करण्याची गरज नाही अशी वैदिकांची मान्यता होती वैदिक परंपरेने स्त्रियांना एक प्रकारचे शूद्रच मानले होते. बसवेश्वरांचा इष्टलिंगधारणा संस्कार बालपणीच झाला होता, त्यामुळे त्यांनी केवळ एकाच धार्मिक संस्काराची गरज असल्याने स्त्री-पुरुषात भेद करणारा हा उपनयन संस्कार करण्यास नकार दिला. प्रत्येक पुरुषाचा जन्म हा स्त्रीपासूनच झाला असून ती सर्वश्रेष्ठ आहे ती पवित्र आहे असे बसवेश्वरांचे मत होते.

- **जातिभेदाचा विरोध :-**

बसवेश्वरांच्या काळात समाजात चातुर्वर्ण वाढले होते. समाज हा चार वर्गात विभागलेला होता. ब्राह्मण वर्गाकडे धार्मिक विधीची कामे होती. क्षत्रिय वर्गाकडे संरक्षणाचे कार्य होते. वैश्य वर्गाकडे व्यापार उदिम होता, तर शूद्र वर्गाकडे वरील तीन वर्गाच्या सेवेचे काम होते. जातिजतीमधील उच्चनिच्चतेची सर्वाधिक झळ ही या वर्गाला बसत होती. या लोकांना मंदिरात प्रवेश नव्हता. त्यांना मेलेल्या जनावरांना ओढून नेण्याचे काम करावे लागत, तसेच मेलेल्या जनावराच्या कातडीपासून पादत्राणे बनवण्याचे काम या वर्गातील लोक करत त्यांना अस्पृश्य मानले जात होते. उच्च वर्गातील लोकांना त्यांचा स्पर्श झाल्यास तो विटाळ मानला जाई. शूद्र व स्त्रियांना विद्यार्जनाचा अधिकार नव्हता.

सारा समाज हा एक आहे माणसा माणसात फरक नाही हे बसवेश्वरांनी वारंवार सांगितले. स्त्री स्वातंत्र्याच्या विषयी तर बसवेश्वर यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे. "जिवणाचे ध्येय साधण्याचा अधिकार पुरुषांनाच का असावा? स्रीयांना का असू नये?" असे ते समाजाला विचारतात. धर्म, तत्व, समाजनीती या क्षेत्रात स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे स्वातंत्र असले पाहिजे असे मत त्यांचे असून, बसवेश्वरांनी अनेक वेळा ते कृतीतूनही दाखवून दिले आहे. उच्चनीचता, स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव ही बसवेश्वरांना

मान्य नव्हता. “भेदाभेद सर्व मंगळ” असे आपले संत मानतात. बसवेश्वरांनीही ही गोष्ट आपल्या ‘बसवचनात’ पुन्हा पुन्हा सांगितले आहे. रूढी प्रिय समाजाच्या विरोधाला न जुमानता स्पृश्य अस्पृश्य विवाहाला त्यांनी मान्यता दिली. समाजाचा जळजळीत विरोध पत्करण्याचे धाडस बसवेश्वर जवळ होते, त्यामुळे ते खचलेही नाहीत आणि डगमगले ही नाहीत. बसवेश्वरामुळे हरळप्पा चांभार, कक्कय्या ढोर, शिवनागमय्या महार, चेन्नय्या, केतय्या बुरुड, उरिलिंग पेद्दीचोर, बोमय्या किन्नर, नागोराव कांबळे या सर्व दलित वर्गीयांनी इष्टलिंग दीक्षा घेतली होती बसवेश्वरांनी समतेचा पुरस्कार करताना समाजाला समतेची शिकवण दिली. अंधश्रद्धेचा तिरस्कार केला होता. सर्वांचे समानता हे त्यांचे तत्त्व होते. सामान्य जीवनातील उदाहरणातून समानतेची शिकवण देताना ते म्हणतात

“शिवालय आणि महार वाड्याची |
भूमि ती एकाची दोन्ही साठी ||
आचमन स्वच्छ दोन्हीचे ते जळ |
एकच निर्मळ दुजे नाही ||”

कोणताही व्यवसाय एखाद्या व्यक्तीला उच्च नीच ठरवू शकत नाही. प्रामाणिकपणे केलेले कोणत्याही काम हे हलक्या प्रतीचे असू शकत नाही, ही शिकवण बसवेश्वर देतात.

बसवेश्वरांच्या मते

हत्या करतो तो नीच
सडके मांस खातो तो शूद्र
यात जात ना पात
कुडल संगमला शरण जातो
चराचरावर प्रेम करतो
तोच खरा कुलवंत असतो

- **अनुभव मंटप :-**

महात्मा बसवेश्वरांनी अठरापगड जाती धर्मातील स्त्री-पुरुषांसाठी वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी “अनुभव मंटप” नावाने सामाजिक, सांस्कृतिक विचारपीठ स्थापन केले. अनुभव मंटप ही एक प्रकारे संसदेसारखी संस्था होती. पूर्वी जनक राजाकडे विद्वानाची एक सभा असे त्याप्रमाणे अनुभव मंटपचे स्वरूप होते. अनुभव मंटप ही लोकशाही प्रकारची संस्था होती या अनुभव मंटपामध्ये एकूण ७७० पुरुष आणि ७० स्त्रियांचा समावेश होता. ज्याप्रमाणे अनुभव मंटपात पुरुषांना सहभाग होता त्याप्रमाणे स्त्रियांना ही होता. अनुभव मंटप हा अद्वितीय होता. अनुभव मंटपाच्या सदस्यांमध्ये जात, धर्म, पंथ, लिंग, वय, वर्ग, व्यवसाय, भाषा इत्यादी भेदभाव पाळले जात नसत, ज्याने इष्टलिंग दीक्षा घेतली असेल त्यांना प्रत्येकांना अनुभव मंटपाचा सदस्य होता येत असे. अनुभव मंटपाच्या सदस्य पुरुषांना ‘शिवशरण’ तर स्त्री सदस्य स्त्रियांना ‘शेरनी’ म्हटले जात होते. १२व्या शतकात सर्वत्र विषमता पसरलेली असताना महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटपाची स्थापना करून समतेचे आव्हान करून संकुचित वृत्ती तसेच जाती-धर्माच्या बंधनापासून माणसाला दूर ठेवण्यास सुरुवात झाली. स्त्रियांना देण्यात आलेल्या अधिकारामुळे अनुभव मंटप ही संस्था आणि लिंगायत धर्म दोघांनाही व्यापक स्वरूप प्राप्त झाले. अनुभव मंटपात अनेक शेरनी स्त्रियांनी वाचनांची रचना केली होती. ज्यामध्ये महादेवी, निजदेवी, सुतकातनारी, रेम्मव्वा, सत्यवती, दानम्मा, मुक्तायक्का, शिवप्रिया, रायम्मा, महादेवी पद्मावती, रेचम्मा, लिंगम्मा, विरम्मा, कलम्मा यासारख्या अनेक वचनकार स्त्रिया अनुभव मंटपात लिहिता झाल्या होत्या यामध्ये वेश्या नाही प्रवेश मिळाला होता.

स्त्रियाप्रमाणेच अनुभव मंटपात विविध जातीच्या लोकांनीही वचन निर्मिती केली होती. तिथे सर्वांनाच समानतेची वागणूक मिळत होती. माचीदेव हे जातीने धोबी होते. शरण कक्कया हा उज्जयनीचा ढोर जातीचा होता. हरळय्या चांभार व मधुरय्या हे ब्राह्मणही अनुभव मंटपात होते. हडपद अपंण्णा हे बसवन्नाचे सहाय्यक असून ते न्हावी समाजाचे होते. शांत रस हे अनुभव मंटपाचे वचन भांडरक होते. मरुळ शंकरदेव हे गंधार देशातून आलेले शरण होते. तमिळनाडूतून आलेले महाशरण चन्नय्या हे मांग जातीचे होते. उरीलिंग पेद्दी हे अस्पृश्य शिवशरण होते. बुरुड समाजाचे केतय्या अनुभव मंटपाचे सदस्य होते. जातीभेद आणि स्त्री पुरुष समान मानणारे अनुभव मंटप हे प्रमुख केंद्र होते. जातीने ब्राह्मण असलेल्या माधुवय्याची मुलगी वनजा उर्फ कलावती आणि चांभार असलेल्या हरळय्याचा मुलगा शीलवंत यांचा विवाह अनुभव मंटपात झाला. या दोघांनीही इष्ट लिंग दीक्षा घेतल्यामुळे त्याला अडचण नव्हती परंतु समाजातून हा विवाह आंतरजातीय विवाह म्हणून याला विरोध झाला. कल्याण क्रांतीसाठी हाच विवाह कारण ठरला. या विवाहामुळे या काळात समाजात जाती जातीतील विवाह बंधने कठोर होत गेली असावेत. आंतरजातीय झालेल्या या विवाहाची तक्रार राजा बिज्वलाकडे गेल्यानंतर हरळय्या व मधुपय्या या दोन्ही व्याह्यांना राजाने अटक करण्याचा आदेश दिला. याच चुकीच्या आदेशाचा निषेध म्हणून बसवण्णांनी त्याग पत्र दिले. या दोन्हीही व्याह्यांना दोषी पकडून तयांचे डोळे काढण्यात आले. तसेच त्यांना हत्तीच्या पायी देऊन त्यानंतर त्यांना किल्ल्याच्या बुरुजावरून फेकण्यात आले. हा विवाह त्या काळात अनुभव मंटपाचे सामूहिक क्रांतिकारक पाऊल होते.बाराव्या शतकात बसवेश्वरानी केलेले हे कार्य आज एका वरदान प्रमाणे आहे. हरळय्या आणि मधुवय्या हे दोघे या समतेच्या अग्नि कुंडात पहिले बळी ठरले. अल्ल व मल्ल या दोन व्यक्तींनी बीज्वलाच्या दरबारी जाऊन त्याची हत्या केली इथून पुढेच सगळीकडे लिंगायतच्या कत्तली सुरू झाल्या. शरणांचे वचन भंडार आगेच्या भक्षस्थानी पडले. शरण बांधवांनी वचने वाचण्यासाठी कल्याण सोडण्याचा निर्णय घेतला यामध्ये स्त्रिया, दलित प्रामुख्याने सहभागी होते. या सर्व शरण शरणार्थ्यांना सोलापूरच्या राणी चमला देवी ने शरण दिले.

- **कायक :-**

'कायकवे कैलास' 'श्रम हाच स्वर्ग'होय हे महात्मा बसवेश्वरांचे प्रसिद्ध वचन आहे. बसवेश्वरांनी श्रम प्रतिष्ठेला अतिशय महत्त्व दिले आहे. बसवेश्वरांच्या मते प्रत्येक व्यक्तीने आपला चरितार्थ चालवण्यासाठी कोणतातरी व्यवसाय केला पाहिजे. श्रम म्हणजे काय आहे त्याला कैलासाइतके पवित्र मानले आहे. श्रम हे कैलास याप्रमाणे पवित्र असेल तर मग त्यामध्ये उच्च नीच भेद करण्याचे कारणच नाही. त्यामुळे कायकांमध्ये धर्म कृत्य करणारा पुजारी त्यांचे धर्मविधी, पूजाअर्चा करण्याचे कार्य आणि चर्मकारचे पादत्राणे तयार करण्याचे कार्य एकसारखी आहे. तर या दोघांच्या कार्यामध्ये स्तरभेद असू शकत नाही. ते दोन्ही कार्य पवित्र आणि समान आहेत. असे तत्त्वज्ञान बसवेश्वरांचे होते. चतुर्वण्य ब्राह्मण वर्गाचे आणि इतर दोन उच्च वर्गाचे कार्य श्रेष्ठ मानत होते. तर शूद्रांचे कार्य कनिष्ठ दर्जाचे मानत असत. परंतु बसवेश्वरांचे कायक याबाबतीत समता प्रस्थापित करणारे होते.

बसवेश्वर याबाबतीत म्हणतात,

लोह तापवुनी लोहार झाला, कपडे शिवुनी विणकर |

वेदपटनांनी ब्राह्मण, मग कानातून कोण जन्मला?

बसवेश्वरांना जात पात मान्य नव्हती. नदीचे मूळ आणि ऋषींचे कुळ विचारू नये असे आपल्याकडे म्हटले जाते, त्यासाठी बसवेश्वर म्हणतात,

भुईनीचा सुत व्यास, मांगिनीचा मार्कंडेय |
मंडूकाची कन्या मंदोदरी, वेरड पुत्र अगस्थी ||
. कश्यप लोहार, कोंडीनण्य न्हावी, कुळ जातीचे |
श्रेष्ठत्व कमी होत नाही म्हणून कुळ जात विचारू नये.||

- **दासोह**

दासोह चा अर्थ दानधर्म असा होतो. प्रामाणिकपणे धनसंपत्ती कमवावी आणि नंतर संपत्ती उरली तर तिचा उपयोग गुरु, लिंग, जंगम यांच्या सेवेसाठी करावा. अतिरिक्त संपत्तीच्या वाटपाची कल्पना दासोह या नावाने ओळखले जाते. आपल्या गरजांची पूर्तता झाल्यानंतर जी संपत्ती उरते ती लोककल्याणासाठी खर्च करावी हाच दासोह चा उद्देश असतो. वृद्ध, आजारी, बालक अशा लोकांना उपजीविकेसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. अशावेळी आपल्याकडे आपल्या गरजांची पूर्तता केल्यानंतर जे अधिक धन शिल्लक असते ते समाजातील अशा लोकांकरता खर्च करणे बरोबर वाटते. जैन धर्माने सुद्धा अपरिग्रह तत्त्वाच्या मध्यमातून हेच सांगितले आहे. कमवलेल्या संपत्तीतून गरजू लोकांना वितरण करणे म्हणजेच दासोह.

दासोह या संकल्पनेतही बसवेश्वरांनी समतेचा पुरस्कार केला आहे. दानधर्म हा उत्तान्त हेतूने केला जातो, म्हणजेच मानवतेतून केला जातो, त्याच्यामागे करूणा असते. एखाद्या वेळी समाजात आपले नाव व्हावे या कारणांसाठी दानधर्म केला जातो. पूर्वीचे राजे याच मुख्य हेतुने दानधर्म करत. करण्यासारखे निःस्पृह दातेही होऊन गेले. बसवेश्वर आणि प्रत्यक्ष जीवनात आधी ते उतरले होते. बसवेश्वरांनी दासोहाची जबाबदारी आपल्या पत्नी निलांबीकेवर दिली होती. त्यांच्यावर विश्वास ठेवून दासोमध्ये स्त्री पुरुष समानतेचे तत्व संमेलीत केले. त्यांची एक पत्नी गंगाअंबिका ही सुद्धा बसणणाच्या कार्यात समर्पित होती. त्यांनी महिलांसाठी शिक्षण केंद्र बनवली.

कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी एक सामान्य महात्मा म्हणून बसवेश्वरांचे स्थान मान्य करावे लागते. बसवेश्वरांनी प्रस्थापित उच्च वर्णनात जन्माला येवुनही निम्न वर्णाची दुःख जाणून घेतली. त्यांना जीवनात आलेल्या अनुभवातून त्यांनी सखोल वृत्तीने समानतेचा स्वीकार केला. जे कार्य महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत तुकोबारायांनी केले तेच कार्य महात्मा बसवेश्वरांनी कर्नाटकात केले. स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. कायक, दासोह, अनुभव मंटप इत्यादि बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान समाजाला एक देणगी होय.

**संदर्भ**

1. रोडे डॉ.सोमनाथ - सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर, विद्याभारती प्रकाशन
2. जोशी डॉ. न. म. - जगाद्ज्योती महात्मा श्री बसवेश्वर, मन-रंजन प्रकाशन, पुणे
3. थिप्पेरुद्रस्वामी एच. - भारतीय साहित्य के निर्माता बसवेश्वर, साहित्य अकादेमी
4. तनपुरे डॉ. भाऊराव रामेश्वर - समतावादी महात्मा बसवेश्वर,